गाव तिथे प्रतिनिधी नेमणे आहे..
दैनिक यश सिध्दी न्यूजसाठी महाराष्ट्रासह सोलापूर जिल्ह्यात गावत तिथे प्रतिनिधी नेमणे आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : ९९२१९८८३५८

दैनिक
# यश सिद्धि न्यूज
RNI NO. MAHMAR/2023/84162
YASH SIDDHI NEWS

● वर्ष १ ले ● अंक ९० वा ● गुरुवार १७ ऑगस्ट २०२३ ● पाने ४ ● किंमत ४ रु/-
| * Volume 1 | Issue 90 | Date : 17/08/2023 | blow : Thursday | Page 4 | Price 4

## जिल्ह्यातील धार्मिक स्थळांचा विकास करून भाविकांना पायाभूत सुविधा उपलब्ध करण्यासाठी शासन कटिबद्ध : वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ




**✻ वैद्यकीय शिक्षण मंत्री मुश्रीफ यांच्या हस्ते नवीन जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रांगणात मुख्य शासकीय ध्वजारोहण करण्यात आले ✻ भारतीय स्वातंत्र्यलढ्याचा इतिहास सोलापूर जिल्ह्यातील स्वातंत्र्य सेनानीने दिलेल्या योगदानाचा उल्लेख केल्याशिवाय पूर्ण होऊ शकत नाही ✻ सोलापूर जिल्ह्यातील ६ लाख ७६ हजार शेतकऱ्यांनी पिक विमा भरून विमा संरक्षण मिळवले ✻ जिल्ह्यामध्ये माहे ऑगस्ट ते ऑक्टोबर २०२२ या कालावधीत अतिवृष्टीमुळे झालेल्या शेती पिकांच्या नुकसानी पोटी सुमारे १ लाख २३ हजार बाधित शेतकऱ्यांना १९१ कोटी ७३ लाख रुपयांचे अनुदान प्राप्त ✻ केंद्रशासनाच्या भारतमाला परियोजना अंतर्गत सुरत-चेन्नई या प्रकल्पाची सोलापूर जिल्ह्यात १५३.३३ किलोमीटर ची लांबी असून १ हजार १८० हेक्टर क्षेत्र संपादित करण्यात आले. ✻ राज्यात कृषीसाठी विजेचा वापर करणाऱ्या पहिल्या तीन जिल्ह्यात सोलापूर जिल्ह्याचा समावेश होतो.**

सोलापूर/प्रतिनिधी : जिल्ह्यात धार्मिक पर्यटन स्थळांना विशेष महत्त्व आहे. याच अनुषंगाने शासनाने ७३ कोटी ८० लाख रुपयांचा पंढरपूर मंदिर विकास आराखडा तर ३६८ कोटी रुपयांच्या अक्कलकोट तीर्थक्षेत्र विकास आराखड्याला मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखालील राज्य शिखर समितीने मान्यता दिलेली आहे. त्याप्रमाणेच श्री क्षेत्र हत्तरसंग-कुडल तीर्थक्षेत्र विकासासाठी १७३ कोटी २६ लाखाच्या आराखडयाला शासनाची लवकरच मान्यता मिळेल. जिल्ह्यातील सर्व धार्मिक स्थळांचा विकास करून भाविकांना या ठिकाणी सर्व पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी शासन कटिबद्ध असल्याची ग्वाही, राज्याचे वैद्यकीय शिक्षण व विशेष सहाय्य मंत्री हसन मुश्रीफ यांनी दिली.

नवीन जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रांगणात आयोजित भारतीय स्वातंत्र्य दिनाच्या ७६ व्या वर्धापन दिनाच्या मुख्य शासकीय समारंभाचे ध्वजारोहण वैद्यकीय शिक्षण मंत्री यांच्या हस्ते झाले, त्याप्रसंगी ते मार्गदर्शन करत होते. यावेळी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, सोलापूर महानगरपालिकेच्या आयुक्त शितल उगले-तेली, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मनीषा आव्हाळे, सोलापूर शहर पोलीस आयुक्त राजेंद्र माने, जिल्हा पोलीस अधीक्षक शिरीष सरदेशपांडे, अतिरिक्त पोलीस अधीक्षक हिम्मत जाधव, निवासी उपजिल्हाधिकारी शमा पवार यांच्यासह अन्य विभागाचे विभाग प्रमुख तसेच स्वातंत्र्यसैनिक, ज्येष्ठ नागरिक, माजी सैनिक, प्रतिनिधी-पदाधिकारी नागरिक, विद्यार्थी, पालक व अधिकारी-कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

वैद्यकीय शिक्षण मंत्री श्री. मुश्रीफ पुढे म्हणाले की, जिल्ह्यात माहे ऑगस्ट ते ऑक्टोबर २०२२ या कालावधीत अतिवृष्टीमुळे झालेल्या शेती पिकांच्या नुकसानी पोटी सुमारे १ लाख २३ हजार बाधित शेतकऱ्यांना १९१ कोटी ७३ लाख रुपयांचे अनुदान प्राप्त झालेले होते, त्यापैकी १ लाख २० हजार शेतकऱ्यांना १६० कोटीचे वाटप करण्यात आलेले आहे. तसेच



मार्च व एप्रिल २०२३ या कालावधीत अवकाळी पावसामुळे झालेल्या शेती पिकाच्या नुकसानीचे क्षेत्रिय स्तरावरून पंचनामे करून ४ हजार ५५ बाधित शेतकऱ्यांसाठी ४ कोटी ५० लाख अनुदानाची मागणी शासनाकडे केलेली होती, त्यातील ३ कोटी ९२ लक्ष अनुदान प्राप्त झालेले असून ते थेट शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा करण्याची कार्यवाही सुरु असल्याचे त्यांनी सांगितले.

राज्यातील शेतकऱ्यांच्या शेती पिकाला निसर्गाच्या लहरीपणामुळे होणाऱ्या नुकसानीला संरक्षण देण्यासाठी फक्त एका रुपयात प्रधानमंत्री पिक विमा योजनेचे संरक्षण मिळवून देण्याचा निर्णय घेतला. सोलापूर जिल्ह्यातील ६ लाख ७६ हजार शेतकऱ्यांनी पिक विमा | पान २ वर

## अफेअर, हाऊसवाईफ, प्रॉस्टिट्यूट सारखे शब्द कोर्टातून हद्दपार होणार; सुप्रीम कोर्टाने जारी केली पर्यायी शब्दांची यादी

नवी दिल्ली: सुप्रीम कोर्टाचे सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांनी बुधवारी एका माहिती पुस्तिकेचे अनावरण केले. या पुस्तिकेत लैंगिक भेदभाव, महिलांविषयी रुढीवादी विचार अधोरेखित करणाऱ्या शब्दांचा समावेश आहे. या शब्दांचा वापर कोर्टाच्या कामकाजात होऊ नये यासाठी पर्यायी शब्दांची यादीदेखील देण्यात आली आहे. त्यामुळे आता कोर्टाच्या कामकाजातून अफेअर, हाऊसवाईफ, प्रॉस्टिट्यूट, ईव्ह टीजिंगसारखे शब्द वापरता येणार नाहीत.

सरन्यायाधीश चंद्रचूड यांनी म्हटले की, या माहिती पुस्तिकेतून कोणते शब्द पुराणमतवादी, लैंगिक भेदभाव दर्शवणारे आहेत, त्यांना पर्यायी शब्द कोणता वापरता येईल, याची माहिती देण्यात आली आहे. सरन्यायाधीशांनी सांगितले की, हे पर्यायी शब्द न्यायालयात युक्तिवाद, आदेश आणि निकालाची प्रत करण्यासाठी वापरले जाऊ शकतात. ही माहिती पुस्तिका वकिलांसाठी तसेच न्यायाधीशांसाठी आहे. या पुस्तिकेत ते शब्द सांगण्यात आले होते जे आतापर्यंत न्यायालयात वापरले जात होते. यासोबतच हे शब्द



चुकीचे का आहेत हेही सांगण्यात आले. त्याच्या मदतीने आम्ही महिलांबद्दल आक्षेपार्ह भाषा वापरणे टाळू शकू, असेही सरन्यायाधीशांनी नमूद केले.

या माहिती पुस्तिकेत अफेअरच्या ऐवजी विवाह बाह्य संबंध, प्रॉस्टिट्यूट/हुकर या शब्दाच्या ऐवजी सेक्स वर्कर, ईव्ह टीजिंगच्या ऐवजी स्ट्रीट सेक्शुअल हॅरेसमेंट, हाऊसवाईफच्या ऐवजी होममेकर, आदी शब्दांचा पर्याय सुचवण्यात | पान २ वर

## राज्यात साथीच्या आजारांनी डोकंवर काढलं

मुंबई : राज्यात पावसाळ्यात सुरू झालेल्या साथीच्या आजारांनी डोकंवर काढले आहे. डोळे येणे, इन्फ्ल्यूएन्झा, मलेरिया, डेंग्यू, चिकनगुनिया आणि लेप्टोच्या रुग्णांची रुग्णालयात गर्दी झाली आहे. राज्याच्या आरोग्य विभागाने याची माहिती जारी केली आहे. मागील काही दिवसांपासून डोळे येण्याची साथ वाढली होती. मात्र, आता हा संसर्ग आटोक्यात असल्याचे चित्र आहे. तर, दुसरीकडे राज्यातील मलेरियाच्या एकूण रुग्णांपैकी ८० टक्के रुग्ण हे गडचिरोली आणि मुंबईतील असल्याची माहितीदेखील आरोग्य विभागाने दिली आहे.



राज्यात एकूण ४ लाख २० हजारांच्या जवळपास रुग्णसंख्या आहे. राज्यात १३ ऑगस्टपर्यंत चार लाखांच्या जवळपास डोळ्यांचा संसर्ग झालेल्या रुग्णांची नोंद करण्यात आली होती. संसर्गाच्या मोठ्या उद्रेकानंतर रुग्णसंख्या मोठ्या प्रमाणात वाढत नसल्याचं आकडेवारीवरुन स्पष्ट होत | पान २ वर

## शरद पवारांची आज बीडमध्ये पहिली 'स्वाभिमान सभा'

मुंबई : शरद पवारांची आज बीडमध्ये स्वाभिमान सभा आयोजित करण्यात आली आहे. राष्ट्रवादीच्या फुटीनंतर शरद पवारांनी जाहिर केल्याप्रमाणे आज बीडमध्ये सभा घेणार आहेत. त्यामुळे बीडमध्ये शरद पवार काय बोलणार? धनंजय मुंडेंवर थेट टीका करणार का? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहेत. तर शरद पवार औरंगाबादहून बीडकडे निघाले आहेत. तसेच, औरंगाबाद शहरातून निघाल्यानंतर कार्यकर्ते शरद पवारांसोबत बीडकडे निघतील. रस्त्यात ठिकठिकाणी त्यांच्या सत्कार केला जाणार असून, गेवराईमध्ये बदामराव पंडित यांच्याकडे ते जाण्याची शक्यता आहे. पुढे, बीड बायपासपासून शरद पवार यांच्या रॅलीला सुरुवात होईल. ती रॅली शहरातील माने कॉम्प्लेक्स परिसरात असलेल्या सभा स्थळापर्यंत पोहोचेल. तर याच सभेत पुण्यातील गुप्त भेटीवर शरद पवार भाष्य करुन, कार्यकर्त्यांमधील संभ्रम दूर करण्याची शक्यता आहे.



अजित पवार यांनी शरद पवारांची साथ सोडली आणि भाजपसोबत घरोबा केला. राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये फूट पडल्यानंतर शरद पवारांनी पहिली सभा ही नाशिकच्या येवलामध्ये घेतली. त्यानंतर दुसरी सभा मराठवाड्यात होत आहे. अजित पवारांना साथ देत राज्याचे कृषीमंत्री धनंजय मुंडे यांनी बीड जिल्ह्यातील बहुतेक नेते अजित पवारांसोबत ठेवण्याचा प्रयत्न केला. बीड जिल्ह्यात राष्ट्रवादीची मोठी ताकद आहे. म्हणूनच, शरद पवारांनी मराठवाड्यातील पहिली स्वाभिमान सभा | पान २ वर

## श्रीक्षेत्र अक्कलकोटला येणाऱ्या वाहनांच्या संख्येत लक्षणीय वाढ झाली. सुमारे ७५ हजार वाहने येवून गेली

अक्कलकोट/प्रतिनिधी : सलग सुट्यामुळे गेल्या आठ दिवसात श्रीक्षेत्र अक्कलकोटला येणार्या वाहनांच्या संख्येत लक्षणीय वाढ झाली. सुमारे ७५ हजार वाहने येवून गेली. गेल्या दहा वर्षातील गर्दीचा उच्चांक झाला आहे. राज्यासह परराज्य, परदेशातील स्वामी भक्तांची संख्या अधिक वाढत चालल्याने दररोजची गर्दी श्रींच्या दर्शनाकरिता वाढत चालली आहे. सदरच्या आलेल्या वाहनांना श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे पार्किंग वगळता अन्य कोठेही प्रशस्त वाहनतळ नसल्याने सोलापूर बायपास रोड, कमलाराजे चौक, श्री शहाजी प्रशाला परिसरसह मिळेल त्या ठिकाणी दुतर्फा वाहने उभी करण्यात आलेली होती. याबरोबर मोठ्या प्रमाणात एसटी स्टँड परिसर, वटवृक्ष मंदिर, मैंदर्गी रोड, अन्नछत्र मंडळ परिसर, हत्ती तलाव, बासलेगाव रोड, थडगे मळा रोड, नगरपालिका परिसर या ठिकाणी मोठ्या प्रमाणात वाहतुकीची कोंडी पहायला मिळाली.



वळसंग येथील टोलच्या गणनेनुसार सदर वाहनांची ये-जा गणनेनुसार सुमारे ७५ हजार वाहनांची नोंदली आहेत. वाढते वाहनांचे प्रमाण पाहता त्याप्रमाणे सोयी सुविधा उपलब्ध करुन देण्याची मागणी स्वामी भक्तांतून होत आहे.विक्रमी गर्दीमुळे आलेल्या स्वामी भक्तांना राहणेसाठी खोल्या मिळाल्या नाहीत. निवासाची भक्त निवास, यात्री निवास, यात्री भुवन हाऊसफुल्ल झाले. त्यामुळे अनेक भक्तांना निवासासाठी सर्वत्र फिरावे लागल्याचे चित्र होते. अवास्तव वाहनामुळे वाहतुक व्यवस्था सुरळीत हाताळण्याकामी वाहतुक पोलिसांना दमछाक झाले.

नियमित होत चाललेली वाहनांची गर्दी पाहता प्रशस्त वाहनतळ, स्थानिक रिक्षावाल्यांना वाहतुकीचे नियम काटेकोरपणे पाळणे, ठरलेल्या ठिकाणीच रिक्षांचा थांबा याबरोबरच रिक्षाचालकांची अरेरावी थांबली पाहिजे. या सर्व बाबी गर्दीच्या निमित्ताने समोर आलेली आहे. आता श्रावण महिना सुरु झाल्याने सर्वच दिवस पवित्र मानले जातात. अधिक मासापेक्षा श्रावण मासात देखील दुपटीने गर्दी होण्याची शक्यता वर्तविली जात आहे. त्या अनुषंगाने प्रशासनाकडून वेळीच पावले उचलण्याची मागणी होत आहे.अन्नछत्र मंडळ ते देवस्थान जाणारा रस्ता मोकळा करण्याची मागणी स्वामी भक्तांतून होत आहे.



दैनिक
# यश सिद्धि न्यूज



## ✻ सुविचार ✻

सामर्थ्य हेच जीवन; दुर्बलता म्हणजे मृत्यू होय.
- स्वामी विवेकानंद

## संपादकीय

### एक पाऊल अर्थ प्राप्तीच्या दिशेने

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या कार्यकाळात विकासाची चक्रे झपाट्याने फिरत आहेत. देशातील ५०८ रेल्वे स्थानकांचा पुनर्विकास हा त्यातील एक भाग आहे. ज्या ज्या ठिकाणी रेल्वे स्थानके आहेत तेथे कमी-अधिक प्रमाणावर सुविधा आहेत. त्यात अधिक भर टाकण्याचा प्रयत्न होत आहे. रेल्वे स्थानकांचा विकास हे एक त्यापुढील पाऊल आहे. रेल्वे स्थानकांवर विविध प्रकारच्या सुविधा निर्माण करणे आणि त्याचा प्रवाशांना लाभ पोहोचविणे हे सरकारचे कामच आहे, हीच भावना मोदी सरकार पार पाडत आहेत. रेल्वे स्थानक केवळ भकास अवस्थेतील केंद्र न बनता विकास आणि प्रसन्नतेचे केंद्र बनले पाहिजे ही त्यामागील भावना आहे. भले यासाठी मोठ्या प्रमाणात खर्च होत असला तरी तो देशातील लोकांसाठी अथवा प्रवाशांसाठी होत आहे, ही एक समाधानाची बाब आहे. 'अमृत भारत स्टेशन' पुनर्विकास योजना असे या नव्या योजनेचे नाव असून देशभरातील ५०८ स्थानकांचा या योजनेमुळे कायापालट होणार आहे. अलीकडे मोदी यांच्या हस्ते व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे या योजनेचा शुभारंभ करण्यात आला. जवळपास २५ हजार कोटी रुपयांची ही योजना पूर्णत्वास जाण्यासाठी काही कालावधी लागणार आहे. यामध्ये महाराष्ट्रातील सोलापूरसह ४४ रेल्वे स्थानकांचा समावेश आहे. या अमृत भारत रेल्वे स्थानक पुनर्विकास योजनेच्या माध्यमातून विविध प्रकारच्या सोयी-सुविधा निर्माण करून देत असताना देशात आज अनेक रेल्वे स्थानकांची अवस्था खराब आहे. त्याकडेही लक्ष देण्याची गरज आहे. शिवाय जेथे रूळ वाकडे झाले, दबले असल्यास ते बदलणे, फिश प्लेट बदलणे, ओव्हर हेड वायरकडे लक्ष देणे, सिग्नल यंत्रणा मजबूत करण्यावर भर देऊन होणारे अपघात टाळावे लागतील. जुनाट रेल्वे रूळ बदलावे लागतील. कारण जुन्या रुळांची समस्या गेल्या कित्येक वर्षांपासून रेल्वे प्रशासनाला भेडसावत आहे. त्यादृष्टीने नियोजन करणे आवश्यक आहे. देशातील प्रवाशांची सुरक्षितता सर्वात महत्त्वाची असून त्यांना सुरक्षित आणि सुखद प्रवासाचा विश्वास द्यावा लागणार आहे. असे सर्व केले तरच रेल्वे विभाग ज्या काही सुविधा प्रवाशांना निर्माण करून देत आहे, त्याला एक अर्थ प्राप्त होईल.

## मानसिक स्वातंत्र्यांचे काय...?

देशाला १५ ऑगस्ट १९४७ ला ब्रिटीशांच्या अन्यायकारी, व लुटारू शासनापासुन सुटका करून घेतली. व ब्रिटीशांनी भारत कायदेशीर सोडून देऊन देशाला स्वातंत्र्य जाहीर केले. देश स्वातंत्र्य झाला. आपण स्वातंत्र्य दिन मोठ्या उत्साहाने साजरा करून एक दिवस काही वेळेसाठी का होईना राष्ट्रप्रेम उफाळून आल्या शिवाय राहत नाही. किमान एक दिवस का होईना देशातील जनता स्वातंत्र्य लढ्यात शहिद झालेल्या शहिदांना आदरांजली वाहुन त्यांचा सन्मान केला जातो. १५ ऑगस्ट १९४७ ला स्वातंत्र्य मिळून देश स्वातंत्र्य झाला, २६ जानेवारी १९५० रोजी भारतीय संविधान लागु होऊन माणुस स्वातंत्र्य झाला. कारण संविधान लागु होण्या अगोदर या देशात माणसाचा माणसाला विटाळ व्हायचा, सार्वजनिक ठिकाणी सर्वजाती धर्मातील लोक एकत्र येऊ शकत नव्हते. खालच्या जाणीतील माणसाचा स्पर्श चालत नव्हता, शिक्षण नोकरी करण्याचा अधिकार नव्हता, सत्य असुन बोलता येत नव्हते, महिलांची परिस्थिती तर त्याहून बिकट होती. सर्वासमोर उभे राहता येत नव्हते, माणसासोबत किंवा माणसा अगोदर जेवता येत नव्हते, चौकट ओलांडून जाता येत नव्हते, कोणत्याही प्रकारचे मत मांडता येत नव्हते, घर दार किंवा कोणत्याही संपतीवर कोणताही अधिकार सांगता येत नव्हता, शिक्षण नोकरी तर कल्पना शक्तीच्या पलीकडची गोष्ट होती. परंतु संविधान निर्माण करताना डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर माणसाला केंद्रस्थानी ठेवून संविधान लिहले व स्त्रीपुरुष यांना समान हक्क अधिकार, संधी निर्माण करून बोलण्याचे, फिरण्याचे, शिक्षणाचे, नोकरी चे, धर्माची उपासना करण्याचे स्वातंत्र्य देऊन माणसाला स्वातंत्र्य मिळवून दिले. देशाच्या स्वातंत्र्या बरोबरच मानवी स्वातंत्र्य हि अत्यंत आवश्यक बाब असताना डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी ती पुर्ण केली. मानवी स्वातत्र्यांची जाणीव अनेक लोकांना नाही, सुशिक्षित महिलांनी संविधान वाचले नाही, ज्या महिलांसाठी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी राजीनामा दिला त्या डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांना कधी समजून घेतले नाही. ज्या महिला संविधानामुळे शिक्षण घेतात, नोकरी करतात चांगला पगार घेतात त्या महिला म्हणतात डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर हे बौद्धांचे आहेत, ज्या महिलांना पतीच्या व वडिलांच्या संपत्ती मधील हिस्सा बाबासाहेब आंबेडकर यांनी मिळवून दिला, माझ्या सही मुळे बापाची संपती भावाला विकताच येत नाही किंवा त्याच्या नावावर करताच येत नाही असे बोलणाऱ्या महिला म्हणतात डॉ बाबासाहेब आंबेडकर हे अस्पृश्यांचे नेते होते. परंतु सही शिवाय संपती विकता येत नाही किंवा नावावर करता येत नाही हा हक्क बाबासाहेब आंबेडकर आणि जे शब्द तोडून पडतात तोही हक्क बाबासाहेब आंबेडकर यांनीच दिलेला आहे याची जाणीव नाही. आरक्षणाचा फायदा घेणारे आरक्षणाला विरोध करतात, आरक्षण ही देन ही डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचीच आहे आणि विरोध करण्याचा अधिकार ही डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनीच दिला आहे. थोडक्यात काय तर मानवी स्वातंत्र्याचा उपभोग घेणारे मानवी स्वातंत्र्य कोणी दिले हे मान्य करायला तयार नव्हते यालाच तर मानसिक गुलामी म्हणातात. माणसिक गुलामी म्हणजे स्वतः च्या मेंदुचा कोणताही वापर न करता दुसऱ्या कोणी काहीही सांगत आले तरीही तीच गोष्ट सत्य मानायची, परंतु ती कधी तपासुन बघायची नाही व अंधपणे विश्वास ठेवायचा हिच तर माणसिक गुलामी आहे. याच माणसिक गुलामी मुळे हजारो वर्षापासून शिक्षण, नोकरी, सुविधा, समता, बंधुता, न्याय मिळू शकला नव्हता. माणसिक गुलामी मुळेच तर जाती विषमता, अंधविश्वास, पाखंड, अस्पृश्यता देशामध्ये एवढी फोफावली होती कि माणसाने माणसाला शिक्षण द्यायचा विचार केला तर तो द्रोह होता, सार्वजनिक ठिकाण चे पाणी प्यायचा खालच्या जातीतील लोकांना अधिकार नव्हता, अशी सामाजिक परिस्थिती केवळ मानसिक गुलामी मुळे निर्माण झाली. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी माणसाला माणसिक गुलामीतून बाहेर येण्यासाठी व मानवी स्वातंत्र्या साठी आयुष्य भर कष्ट केले. आणि मानवी स्वातंत्र्य देऊन त्यामध्ये शिक्षणाचा हक्क दिला. शिक्षणाचा हक्क मिळणे हा मानवी स्वातंत्र्याचा भाग आहे तर शिक्षणाच्या माध्यमातून एखाद्या बाबींची चिकित्सा करता येणे, सत्य असत्य तपासून बघणे हे मानसिक स्वातंत्र्याचे लक्षण होय. परंपु डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेल्या मानवी स्वातंत्र्याचा सोईस्कर फायदा घेणारे लोक आजही माणसिक गुलामी मधुन बाहेर यायला तयार नाहीत. आणि माणसिक गुलामी देशासाठी घातक आहे. ज्यांनी १५ ऑगस्ट ला चक्रध्वजाला वंदन करून शहिदांना आदरांजली अर्पण केली, ज्यांना असे वाटते कि राष्ट्राचे हित व्हायला पाहिजे त्यासाठी आपल्याला माणसिक गुलामी तोडणे आवश्यक आहे. जोपर्यंत माणसिक गुलामी तुडणार नाही तोपर्यंत मानवी स्वातत्र्यांचा आनंद उपभोगता येणारच नाही. मानसिक गुलामी तोडली तर देशात धार्मिक व जातीय दंगली होणार नाही, मानसिक गुलामी तोडली तर थोतांड, अंधविश्वास या बाबी लयास जाऊन विज्ञानवाद व तर्कवाद उदयास येऊन देशात वैज्ञानिक निर्माण होतील, मानसिक गुलामी नष्ट झाली तर थोतांड, पाखंड यांच्या नावाखाली भोंदुकडे जमा होणारा हजारो करोडो रुपयाचा पैसा लोक स्वतः चे आरोग्य, शिक्षण, व्यवसाय यावर खर्च करतील व त्यातून सर्वांगीण विकास व्हायला मदत मिळेल. परंतु आजही अनेक लोक जे स्वतः ला सुशिक्षित समजतात ते लोक अज्ञान, विषमता, पाखंड, थोतांड, अंधविश्वास जोपासून भोंदुगीरी करणाऱ्या समोर नतमस्तक होतात. तेव्हाच लक्षात येते याचे शिक्षण वाया गेले. माणसाने नतमस्तक नक्कीच व्हावे पण कोणासमोर यांचेही भाण नसेल केवळ जाती धर्माचा आहे किंवा इतर करतात म्हणून आपण करायचे असे विचार असलेले माणसिक गुलामच आहेत. माणसिक गुलामी तोडण्याचे प्रयत्न महाराष्ट्रात अनेक संतांनी व महापुरूषांनी केले. पण हे एवढे मानसिक गुलाम झालेले आहेत की ज्यांनी माणसिक गुलामी तोडून माणसाचा सर्वांगीण विकास व्हावा यासाठी आपले आयुष्य खर्ची घातले त्याच लोकांना हे गुलाम लोक धर्माचे शत्रु मानायला लागले. मुळात वाईट प्रवृतींचा संबध कोणत्याही धर्माशी असायला नको कसे मत असताना धर्माच्या नावाखाली अंधविश्वास व पाखंड जोपासून त्यांचे संरक्षण करणारे खऱ्या अर्थाने माणसिक गुलाम आहेत. माणसिक गुलामी किती घातक असते हे माणसिक गुलामांना कळत नाही म्हणून तर मुठभर लोकांमुळे ढिगभर ताकदवान लोक गुलाम आहेत. गुलामाचे मालक ताकदवान, बुद्धीमान बिलकुल नाहीत परंतु त्यांनी ताकदवान व बुद्धीमान लोकांना गुलाम बनवून ठेवले म्हणून त्यांना कोणत्याही शारीरिक ताकतीची गरज नाही. व गुलाम लोक स्वतः मेहनत घेऊन कमवतात आणि थोतांड व पाखंड च्या नावाखाली मालकाला देऊन मालकाला हजारो करोडो रुपयांची कमाई करून देतात. माणसिक गुलामी तोडण्यासाठी महात्मा फुले यांनी आपले आयुष्य खर्ची तर घातलेच परंतु बलशाली लोक शिक्षणाच्या माध्यमातून वाचायला लागतील म्हणून त्यांनी अनेक ग्रंथसंपदा निर्माण करून ठेवली त्यापैकी एक म्हणजे गुलामगिरी व तृतीय रत्न नाटक होय. परंतु महात्मा फुलेंचा फोटोही घरात न आणणाऱ्या लोकांनी महात्मा फुलेंचे गुलामगिरी व तृतीय रत्न नाटक वाचण्याचे धाडस होणार नाही हेही सत्यच आहे. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी सांगितले होते गुलामांना गुलामाची जाणीव करून द्या म्हणजे तो बंड करून उठेल. परंतु झोपलेल्या माणसाला जागे करता येते सोंग करणाऱ्यांना जागे करता येत नाही. हीच माणसिकता आजही देशात आहे. लोक राष्ट्र राष्ट्रीय संपती, राष्ट्रीय हीत, राष्ट्रीय प्रतीके यांच्या बाबद गंभीर नाहीत परंतु जात धर्म याबाबत ते अतिसंवेदनशील आहेत कारण ते त्या ठिकाणी गुलाम आहेत. हि गुलामी एवढी वाढली की स्वतः ला धर्माचे प्रचारक समजणारे लोक लोकांना शेण खायचे, प्यायचे सल्ले देत आहेत, तरीही लोक ऐकून घेत आहेत, आरोपी इतर जाती धर्मातील असेल व त्याच्या कडून एखादा शब्द चुकिचा गेला तर रान उठवणारे लोक मात्र धर्माचे ठेकेदार बुद्धीला न पटणारे विधाने करतात आणि त्यांच्या विरोधात काही बोलण्याची हिंमत होत नाही ही माणसिक गुलामी होय. देशाचा विकास हा लोकांच्या एकंदरीत विकासावर अवलंबून असतो. देशाला स्वातंत्र्य मिळाले, मानवाला स्वातंत्र्य मिळाले परंतू मानसिक गुलामीमधुन अजूनही लोक बाहेर यायला तयार नाही. याचाच परिणाम मानवी स्वातंत्र्यावर होत आहे. ज्यांना मानवी स्वातंत्र्यच मान्य नव्हते अशी व्यवस्था लोकांना माणसिक गुलाम म्हणून तर मजबूत करत आहे परंतु मानवी स्वातंत्र्यावरही अनेक बंधने येत आहे. हे बंधने आणण्यासाठी ठेकेदार लोक माणसिक गुलामांचा वापर करून स्वतः चा फायदा करून घेत आहेत. यामध्ये नुकसान हे गुलामांचेच आहे परंतु हे त्यांना कळत नाही. त्यांना कळत जरी नसले तरीही जेव्हा राष्ट्रहीताचा, एकतेचा, समतेचा, बंधुभाव व न्यायाचा विषय येतो तेव्हा हे मानसिक गुलाम समोर दिसतातच म्हणून जागृत असलेल्या माणसाला प्रश्न पडतो मानसिक स्वातंत्र्याचे काय?

**विनोद पंजाबराव सदावर्ते,** रा. आरेगांव ता मेहकर, ता मेहकर जि. बुलढाणा मोबा: ९१३०९७९३००

पान १ वरुन

## जिल्ह्यातील धार्मिक स्थळांचा विकास

भरला आहे. राज्यात कृषीसाठी विजेचा वापर करणाऱ्या पहिल्या तीन जिल्ह्यात सोलापूर जिल्ह्याचा समावेश होतो. शेतकऱ्यांच्या शेती पंपाला सुरळीत वीज पुरवठा होऊन त्यांच्या उत्पादनात वाढ व्हावी यासाठी मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेचा दुसरा टप्पा सोलापूर जिल्ह्यासाठी अत्यंत महत्त्वाचा आहे, अशी माहिती वैद्यकीय शिक्षण मंत्री श्री. मुश्रीफ यांनी दिली.

सोलापूर जिल्ह्यात राष्ट्रीय महामार्गाचे जाळे निर्माण झालेले आहे. केंद्रशासनाच्या भारतमाला परियोजना अंतर्गत सुरत-चेन्नई या प्रकल्पाची सोलापूर जिल्ह्यात १५३.३३ किलोमीटर ची लांबी असून १ हजार १८० हेक्टर क्षेत्र संपादित करण्यात आलेले आहे. जिल्ह्यात राष्ट्रीय महामार्ग अंतर्गत ८, सार्वजनिक बांधकाम विभाग अंतर्गत ४ व महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ अंतर्गत ५ अशा एकूण १७ रस्त्यांच्या भूसंपादनाचे काम पूर्ण झालेले असून ५७ हजार खातेदारांना ३ हजार ८०० कोटी रुपये भरपाई रक्कम देण्यात आलेली आहे. या सर्व महामार्गाच्या जाळ्यामुळे जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासाला अधिक गती मिळणार असल्याचे श्री. मुश्रीफ यांनी यावेळी सांगितले.

सोलापूर शहरात आर्थिक दुर्बल घटकातील असंघटित कामगारांसाठी रे-नगर येथे ३० हजार सदनिकांचा गृहप्रकल्प सुरू करण्यात आलेला आहे. या गृहप्रकल्पात पहिल्या टप्प्यात १० हजार सदनिकांचे काम पूर्ण झालेले असून, त्याचे लोकार्पण लवकरच माननीय प्रधानमंत्री महोदय यांच्या हस्ते करण्याचे नियोजित आहे. श्री. छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालय व डॉ. वैशंपायन स्मृती शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात फायर सेफ्टी करता अत्यंत उपयुक्त असलेली फायर बॉल यंत्रणा जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून सुमारे दोन कोटी रुपये खर्च करून बसवण्यात आलेली आहे. या यंत्रणेमुळे रुग्णालयाची फायर सुरक्षा यंत्रणा अधिक सक्षम झाली असल्याचे श्री. मुश्रीफ यांनी सांगितले.

अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास मागास विकास महामंडळामार्फत जिल्ह्यातील ७ हजार ५४३ उद्योजकांना ४१८ कोटी २८ लाख रुपये कर्ज वाटप झालेले असून, त्यांना या योजनेअंतर्गत ४३ कोटी ४७ लाख रुपये व्याज परतावा देण्यात आलेला आहे. रमाई आवास योजना अंतर्गत सन २०२३-२४ या वर्षात नागरी भागातील एकूण ९०३ घरकुले मंजूर करण्यात आलेली आहेत. जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा अंतर्गत केंद्र व राज्य पुरस्कृत विविध घरकुल योजना असून सन २०१६-१७ ते सन २०२२-२३ पर्यंत ७० हजार घरकुले देण्याचे उद्दिष्ट होते, त्यापैकी ४९ हजार ८४८ घरकुले पूर्ण झालेले आहेत तर १६ हजार १५९ घरकुलांची कामे प्रगतीपथावर आहेत. या पद्धतीने जिल्ह्यातील बेघरांना घरकुल उपलब्ध करून देण्यासाठी शासन कटीबद्ध असल्याची माहिती श्री मुश्रीफ यांनी दिली.

सोलापूर महापालिका क्षेत्रात स्मार्ट सिटी अंतर्गत विविध पायाभूत विकासाची कामे सुरू आहेत. जल जीवन मिशन अंतर्गत २०२४ अखेरपर्यंत 'हर नल से जल' हे उद्दिष्ट ठेवण्यात आलेले आहे. हे उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी गतिमान पद्धतीने काम सुरू आहे. राज्य शासन एक महत्त्वकांक्षी उपक्रम म्हणून 'शासन आपल्या दारी' हे अभियान राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात राबवत आहे. एका छताखाली सर्व शासकीय योजनेचा लाभ लाभार्थ्यांना देण्यात येत आहे. प्रत्येक जिल्ह्याला ७५ हजार लाभार्थ्यांना एकाच दिवशी लाभ देण्याचे उद्दिष्ट देण्यात आलेले आहे. त्याच अनुषंगाने हा कार्यक्रम सोलापूर जिल्ह्यातील पंढरपूर येथे घेण्याचे नियोजित असून जिल्हा प्रशासन हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रयत्नशील असून या कार्यक्रमात जिल्ह्यातील जास्तीत जास्त नागरिकांनी सहभाग घेऊन शासकीय योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन वैद्यकीय शिक्षण मंत्री मुश्रीफ यांनी केले.

भारतीय स्वातंत्र्य लढ्याचे महत्त्व सांगून या स्वातंत्र्यलढ्याचा इतिहास सोलापूर जिल्ह्यातील स्वातंत्र्य सेनानीने दिलेल्या योगदानाचा उल्लेख केल्याशिवाय पूर्ण होऊ शकत नाही. देशभक्त मल्लप्पा धनशेट्टी, किसन सारडा, जगन्नाथ शिंदे, कुर्बान हुसेन यांच्यासह अनेक ज्ञात-अज्ञात महानायकांचे स्वातंत्र्य लढ्यातील योगदान मोलाचे आहे. त्यांच्या कार्याप्रती वैद्यकीय शिक्षण मंत्री मुश्रीफ यांनी कृतज्ञता व्यक्त करून भारतीय स्वातंत्र्य दिनाचा ७६ वा वर्धापन दिन निमित्त ध्वजारोहण समारंभास उपस्थित असलेले स्वातंत्र्य सैनिक, ज्येष्ठ नागरिक, लोकप्रतिनिधी, पदाधिकारी, अधिकारी, कर्मचारी, विद्यार्थी, पालक, पत्रकार व नागरिकांना स्वातंत्र्य दिनाच्या शुभेच्छा दिल्या.

प्रारंभी वैद्यकीय शिक्षण मंत्री मुश्रीफ यांच्या हस्ते भारतीय प्रजासत्ताकाचा ७६ व्या वर्धापन दिनानिमित्त मुख्य शासकीय ध्वजारोहण करण्यात आले. त्यानंतर राष्ट्रगीत व राज्य गीत गायन झाले. या कार्यक्रमास उपस्थित स्वातंत्र्यसैनिक, ज्येष्ठ नागरिक व अन्य मान्यवरांची भेट घेऊन त्यांना स्वातंत्र्य दिनाच्या शुभेच्छा दिल्या. तसेच यावेळी मंत्री महोदयांनी सर्व उपस्थित नागरिकांना तंबाखू व तंबाखूजन्य पदार्थ सेवन न करण्याबाबतची शपथ दिली. यावेळी वैद्यकीय शिक्षण मंत्री मुश्रीफ यांच्या हस्ते सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक नागनाथ चंद्रकांत फुटाणे यांना उत्कृष्ट कामगिरीबद्दल राष्ट्रपती पोलीस मेडल आणि प्रशस्तीपत्र देण्यात आले. त्यानंतर इयत्ता पाचवी ते आठवी मधील राज्य गुणवत्ता यादीतील विद्यार्थ्यांचा गुणगौरव करण्यात आला. महसूल विभागाच्या गट क संवर्गाच्या अनुकंपा प्रतीक्षा सूचीतील उमेदवारांना मंत्री महोदयांच्या हस्ते नियुक्तीपत्र देण्यात आले. त्याप्रमाणेच महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना व आयुष्यमान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेत उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या उपजिल्हा रुग्णालय करमाळा व देवडीकर मेडिकल सेंटर अकलूज यांचा गौरव ही श्री. मुश्रीफ यांच्या हस्ते यावेळी करण्यात आला.

## अफेअर, हाऊसवाईफ, प्रॉस्टिट्यूट

आला आहे. सरन्यायाधीशांनी जारी केलेल्या माहिती पुस्तिकेत अनेक शब्द जेंडर न्यूट्रल शब्दांचा वापर करण्यात आला आहे. कलकत्ता उच्च न्यायालयाच्या न्यायाधीश मौसमी भट्टाचार्य यांच्या अध्यक्षतेखालील समितीने ही पर्यायी शब्दांची माहिती पुस्तिका तयार केली आहे. लिंग रूढींवर आधारित सामान्य परंतु चुकीच्या तर्क पद्धतींवर या माहिती पुस्तिकेत बोट ठेवण्यात आले आहे.

**सर्वोच्च न्यायालयाच्या वेबसाइटवर माहिती पुस्तिका अपलोड होणार** ही पर्यायी शब्दांची माहिती पुस्तिका लवकरच सर्वोच्च न्यायालयाच्या संकेतस्थळावर अपलोड करण्यात येणार असल्याचे सरन्यायाधीशांनी सांगितले. यासोबतच व्हिडीओ ट्युटोरियल्ससह ई-फायलिंगसाठी युजर मॅन्युअल देखील असेल. या हँडबुकमध्ये न्यायाधीशांना प्रोवोकेटिव क्लॉथिंग ऐवजी क्लॉथिंग हा शब्द वापरण्याची सूचना केली आहे. अविवाहित आईच्या जागी फक्त आई हा शब्द वापरण्याची सूचना करण्यात आली आहे.

## राज्यात साथीच्या आजारांनी

असल्याचे आरोग्य विभागाने म्हटले. डोळ्यांचा संसर्ग झाल्यास तातडीने डॉक्टरांचा सल्ला घ्यावा असे आवाहनही करण्यात आले आहे. डोळे आल्यानंतर काही दिवसांच्या अवधीत संसर्ग बरा होत असल्याने रुग्णांनी काळजी करू नये. मात्र, स्वच्छता पाळावी आणि डॉक्टरांनी दिलेला सल्ला पाळावा असे आवाहन आरोग्य विभागाने केले आहे. राज्यात इन्फ्लूएन्झा 'एच१एन१' आणि 'एच३एन२'ची सक्रिय रुग्णसंख्या दोन हजार १५५ इतकी नोंदवण्यात आली आहे. दोन हजार १५५ रुग्णांपैकी १२६ जणांवर रुग्णालयात उपचार सुरु आहेत. इन्फ्लूएन्झाचे सर्वच रुग्ण देखरेखीखाली असल्याचे आरोग्य विभागाने सांगितले. मलेरियाचे राज्यात एकूण ८ हजार ४० रुग्ण नोंदवण्यात आले आहेत.राज्यात मलेरियामुळे आतापर्यंत सहा जणांचा मृत्यू झाला आहे. राज्यातील मलेरियाच्या एकूण रुग्णसंख्येच्या ८० टक्के रुग्ण गडचिरोली आणि मुंबईतील आहे.

गडचिरोलीत ३ हजार ५२६ आणि मुंबईत दोन हजार ८८६ मलेरिया रुग्णांची नोंद झाली असल्याची माहिती आरोग्य विभागाने दिली. राज्यात आतापर्यंत डेंग्यूमुळे एका रुग्णाचा मृत्यू झाला आहे. गेल्या आठवड्याच्या तुलनेत या आठवड्यात डेंग्यूच्या रुग्णांच्या संख्येत घट झाली आहे. गेल्या आठवड्याच्या तुलनेत राज्यात डेंग्यूच्या रुग्ण संख्येत घट झाली आहे. ७३८ वरून ५४६ इतकी रुग्ण संख्या आढळली आहे.

सोबतच यंदाच्या आठवड्यात मुंबईतील डेंग्यूच्या साथीची रुग्णसंख्या ४३६ वरुन २०८ वर आल्याची आरोग्य विभागाने माहिती दिली आहे.मुंबईत डेंग्यूची एकूण रुग्णसंख्या १३२३ इतकी आहे. गेल्या आठवड्याच्या तुलनेत ग्रामीण भागातील सिंधुदुर्ग जिल्ह्यातील रुग्णसंख्या शून्यवरुन ४९ वर पोहोचल्याची माहिती आरोग्य विभागाने दिली आहे.

## शरद पवारांची आज बीडमध्ये

बीडमध्ये ठेवली आहे.

राजकीय घडामोडीत कायमच संवेदनशील जिल्हा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या बीड जिल्ह्यात राष्ट्रवादी काँग्रेसची मोठी ताकद आहे. सत्तेत असताना आणि विरोधी बाकावर बसले असतानाही शरद पवारांसोबत कायम बीड जिल्हा आघाडीवर राहिला आहे. म्हणूनच, मराठावाड्यातील पहिली जाहीर सभा ही बीडमध्ये होत आहे. अर्थात याला दुसरे कारण म्हणजे राज्याचे कृषीमंत्री धनंजय मुंडे हे बीडचे आहेत.

राष्ट्रवादीत बंडखोरी झाल्यावर बीड विधानसभा मतदारसंघाचे आमदार संदीप क्षीरसागर यांनी मात्र मोठ्या पवारांसोबत कायम राहण्याचा निर्णय घेतला. म्हणूनच संदीप क्षीरसागर यांच्यावर पवारांनी जिल्ह्याची जबाबदारी टाकली. नव्यानेच राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष झालेल्या संदीप क्षीरसागर यांनी पवारांच्या सभेची जय्यत तयारी केली. बीड जिल्ह्यातील सहा विधानसभा मतदारसंघात जाऊन राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यकर्त्यांच्या बैठका घेतल्या. बीडमधील सभा यशस्वी करण्यासाठी जिल्ह्याचा दौरा केला. विशेष म्हणजे परळीत जाऊन कोणालाही घाबरू नका असे सांगून धनंजय मुंडेनाही आव्हान दिले.

## श्री एस एस शेळके प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालय वागदरी येथे स्वातंत्र्यदिन मोठ्या उत्साहात साजरा

वागदरी/प्रतिनिधीः श्री एस एस शेळके प्रशालेत भारतीय स्वातंत्र्याचा ७७ व्या स्वातंत्र्य दिनाचे आयोजन मोठ्या उत्साहात पार पडले . प्रारंभी संस्थेचे ज्येष्ठ संचालक श्री ढवणे यांच्या शुभहस्ते ध्वजारोहण करण्यात आले . ध्वजारोहणानंतर राष्ट्रगीताचे, राज्य गीताचे गायन करण्यात आले, व संविधानचे वाचन करण्यात आले .

सन २०२२- २३ या शैक्षणिक वर्षातील इयत्ता दहावी व बारावीतील प्रथम, द्वितीय, तृतीय क्रमांकाच्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला, तसेच नंदर्गी शिष्यवृत्तीत प्रथम आलेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार व बक्षीस वितरण करण्यात आले त्याचप्रमाणे प्रशालेतील आदर्श विद्यार्थी व विद्यार्थिनी यांचा गुणगौरव तसेच उत्कृष्ट खेळाडू यांचा यथोचित सत्कार करण्यात आला . या कार्यक्रमास प्राचार्य श्री अनिल देशमुख , पर्यवेक्षिका शैलशिल्पा जाधव ,संस्थेचे चेअरमन श्री बसवराज शेळके , तसेच संस्थेचे सर्व संचालक, तसेच गावातील सर्व प्रतिष्ठित नागरिक, तसेच माजी विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते तसेच प्रशालेचे सर्व



शिक्षक, शिक्षिका, शिक्षकेतर कर्मचारीवृंद, प्राध्यापक वर्ग यांच्या सहकार्याने कार्यक्रम यशस्वी पार पडला या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री नितीन कुलकर्णी व राजश्री शेळके यांनी केले तसेच शेवटी श्री एम एम देशमुख यांनी आभार मानले.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी, मुद्रक, प्रकाशक, संपादक, कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन्स अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार , रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु.पो. गोगांव ता. अक्कलकोट जि सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे email ; yashsiddhinewsgmail.com www.yashsiddhinews.com mo: 9921988358

This newspaper is printed by the Owner , Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor, Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur 413002 [Maharashtra], Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 [Maharashtra]. Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

# कै पंचप्पा कल्याणशेट्टी शिक्षण संकुलात स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा

अक्कलकोट/प्रतिनिधी : महर्षि विवेकानंद समाजकल्याण संस्थेचे सौ सुरेखा कल्याणशेट्टी माध्य व उच्च माध्यमिक मराठी व सेमी इंग्रजी विद्यालय, मातोश्री गुरुबसवा कल्याणशेट्टी कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, गिरीजामाता मराठी व सेमी इंग्रजी विद्यालय, वीर शिरीष कुमार बाल संस्कार केंद्र, यशवंराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ अभ्यासकेंद्र, नालंदा विदयार्थी वसतीगृह यांच्या वतीने कै पंचप्पा कल्याणशेट्टी शिक्षण संकुलात स्वातंत्र्याचा अमृत मोहोत्सव सांगता समारंभ व स्वातंत्र्य दिन मोठया उत्साहात व विविध उपक्रमांनी साजरा करण्यात आला. यावेळी संस्थेच्या संचालिका सौ रुपाली येणगुरे यांच्या शुभहस्ते प्रतिमा पूजन व ध्वजारोहण करण्यात आले. याप्रसंगी प्रमुख उपस्थित म्हणून जेष्ठ संचालक मल्लिनाथ कल्याणशेट्टी,संचालिका सौ शांभवी कल्याणशेट्टी,सीइओ सौ रूपाली शहा, ज्युनियर कॉलेज विभाग प्रमुख



पूनम कोकळगी, सचिव भिमराव साठे, संचालक मुकुंद पत्की, विवेकानंद प्रतिष्ठानचे संचालक अशोक येणगुरे, संचालक मल्लिनाथ मसुती, प्राचार्य डॉ राजेंद्रसिंह लोखंडे हे उपस्थित होते. याप्रसंगी विद्यार्थ्यांनी क्रांतिकारकांचे चित्र रेखाटन,पक्षी वाचवा पर्यावरण वाचवा भिंतीचित्रे, मिठ्ठी को नमन विरोंको वंदन भिंतीचित्र, राष्ट्रीय नेत्यांची वेशभूषा, देशभक्तीपर गीत, नृत्य, मनोरे, योगा प्रात्याक्षिके व स्वातंत्र्य काल आणि आज,चला घडवूया भारत, वास्तविक भारत, मला स्त्री म्हणून जगायचं आहे, अंतराळयुग इत्यादी विषयावर विदयार्थ्यांनी भाषणे केली. तसेच संचालक मुकुंद पत्की यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या कार्यक्रमास प्राचार्य मलकप्पा भरमशेट्टी,पर्यवेक्षक मोतीलाल चव्हाण, प्राथमिकचे मुख्याध्यापक सुरेश आवटे, निखिल भालेराव, बापुजी निंबाळकर, शिवानंद पुजारी,प्रा खंडेराव घाटगे सर्व शिक्षक, कर्मचारी व पालक मोठया संख्येने उपस्थित होते सूत्रसंचालन कल्पना स्वामी व सलोनी शहा यांनी केले तर आभार निशिगंधा कोळी यांनी मानले.

# तरुण–तरुणींनी मोबाईल दूर ठेऊन अधिकाधिक वेळ ग्रंथालयात द्यावा व आपले करिअर घडवावे : कॅप्टन कुणाल गायकवाड

## मुक्तीभूमी सार्वजनिक वाचनालय व अभ्यासिकेचा चौथा वर्धापन दिन उत्साहात साजरा

येवला/प्रतिनिधी :डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा शैक्षणिक सामाजिक,साहित्य, आर्थिक,राजकीय,सांस्कृतिक व धम्मविचार तरुणांनी आचरणात आणावा व आपल्या शैक्षणिक जीवन काळातच आपली योग्यता सिद्ध करावी असे आवाहन कॅप्टन कुणाल गायकवाड यांनी केले. लोककवी वामनदादा कर्डक यांनी बुद्ध कबीर तुकोबा छत्रपती शिवाजी महाराज क्रांतीज्योति महात्मा फुले शाहू महाराज महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार आपल्या शाहिरीतून लोक माणसात रुजवले तोच वारसा आजच्या कवी गीतकार शाहीर कलावंतांनी पुढे न्यावा व आजच्या देशाच्या सर्वार्थाने विपरीत झालेल्या ज्वलंत सामाजिक,राजकीय, आर्थिक,सांस्कृतिक, क्षेत्राबद्दलच्या समस्येवर आपल्या शाहिरी कवणातून जळजळीत भाष्य करावं तरुणांनी लेखण्या हाती घेऊन लोकशाही,समता स्वातंत्र्य,न्याय,बंधुता,राष्ट्रीय एकता व एकात्मता या संविधानिक मूल्यावर आपला देश बळकट करावा असे उद्गार कर्मवीर पद्मश्री दादासाहेब गायकवाड यांचे नातू कॅप्टन कुणाल गायकवाड यांनी काढले डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारक समिती लोककवी वामनदादा कर्डक प्रतिष्ठान नाशिक महाराष्ट्र यांच्या संयुक्त विद्यमाने येथे भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर मुक्तीभूमी सार्वजनिक वाचनालय व राष्ट्रीय महाकवी वामनदादा कर्डक मुक्तीभूमी अभ्यासिकेच्या चौथ्या वर्धापन दिनानिमित्त वाचक मेळावा व वामनदादा कर्डक यांच्या १०१ व्या जयंती निमित्त आयोजित कार्यक्रमात ते मुख्य अतिथी म्हणून बोलत होते कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सुप्रसिद्ध समीक्षक साहित्यिक प्रा डॉ.जीभाऊ मोरे हे होते प्रारंभी राष्ट्रपुरुषांच्या प्रतिमांना मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुक्तीभूमी सार्वजनिक वाचनालय व अभ्यासिके चे संस्थापक प्रा शरद शेजवळ यांनी केले मुक्तीभूमी सार्वजनिक वाचनालय व कर्डक अभ्यासिकेच्या स्थापने मागील हेतू हा ग्रामीण,कष्टकरी,शेतकरी, शेतमजूर,श्रमकरी वर्गातील मुलांना विविध स्पर्धा परीक्षा साठी आवश्यक असलेले उपयुक्त पुस्तके व अभ्यासकेसाठी मोफत प्रवेश सुविधा गेल्या चार वर्षापासून पुरवली जात असून जास्तीत जास्त युवक युवतींनी या संधीचा फायदा घेऊन आपले करिअर घडवावे व वाचनालयाच्या साधन सुविधा वृद्धिंगत करण्यासाठी दानदात्यांनी ग्रंथ पुस्तके व फर्निचर स्वरूपातील वस्तू वाचनालयास भेट कराव्यात असे आवाहन यावेळी शेजवळ यांनी केले.

वाचनालयाचे संस्थापक शरद शेजवळ,सचिव शैलेंद्र वाघ,स्मारक समितीचे अध्यक्ष प्रकाश वाघ,उपाध्यक्ष गौतम पगारे,रमेश गायकवाड,सुभाष गांगुर्डे,रणजित संसारे,सुरेश



खळे सामाजिक कार्यकर्ते विकास वाहुळ,विकास घोडेराव आदी मान्यवर उपस्थित होते.अभ्यासिकेचे विद्यार्थी मिलिंद पान पाटील ( नीट परीक्षा उत्तीर्ण,सदाशिव वाहूळ रेल्वे कर्मचारी निवड,सविताताई धीवर कामगार तलाठी म्हणून निवड झाल्याबद्दल सत्कार करण्यात आला. ह्या प्रसंगी रामभाऊ वाहुळ,प्रदीप पगारे,ऋषी गायकवाड,रोहित गायकवाड,शुभम गायकवाड ,महेश जाधव,ऋतिक गायकवाड,अक्षय गरुड, सुमित गरुड,ललित भांबरे,पवन दळे,समाधान निकाळे, सचिन गरुड,तमन्ना सिद्दीकी, समिक्षा मेथे,जयश्री सदाफळ,साक्षी वाणी,सायली पवार,सुवर्णा पाबळे आदी विद्यार्थी वाचक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राजरत्न वाहुळ यांनी केले तर आभार शैलेंद्र वाघ यांनी मानले.

# हन्नुर येथील अंगणवाडीत स्वातंत्र्य दिनानिमित्त बालकांना खाऊ वाटप



अक्कलकोट/प्रतिनिधी :हन्नुर येथील मिनी अंगणवाडीत स्वातंत्र्यदिनानिमित्त बालकांना खाऊ वाटप करण्यात आले.व तसेच बालकांना मनोरंजनात्मक, खेळणी घेण्यात आली.बालकांच्या ज्ञानात भर पडण्यासाठी.ज्ञान दर्जानात्मक खेळेण्यात आले.यावेळी पालकांच्या व लाभार्थ्यांच्या उपस्थितीमध्ये , खाऊ वाटप करण्यात आले.मिनी अंगणवाडी सेविका ज्योती बाळशंकर, पालक उषा थोरात, संजय थोरात, उत्तम बाळशंकर, आदी पालक व बालक उपस्थित होते

# सदाशिवराव देठे निवासी प्रशाला येथे १५ ऑगस्ट मोठ्या उत्साहात व आनंदात साजरा

## ७०००० रु देणगी देऊन ॲड.बाबर यांनी आदर्श निर्माण केला..!

माळशिरस/तालुका प्रतिनिधी : चांदापुरी ता.माळशिरस येथील सदाशिवराव देठे निवासी प्रशाला व ज्यू कॉलेज येथे उत्साहात व आनंदात साजरा करण्यात आला यावेळी ऍड धनंजय बाबर यांच्या हस्ते झेंडावंदन करून राष्ट्रध्वजाला सामूहिक मानवंदना देण्यात आली.

प्रशालेतील विद्यार्थ्यांनी चांदापुरी गावातुन रॅली काढली त्याचबरोबर प्राचार्य प्रा. कुंडलिक साठे यांनी अहिल्याबाई होळकर यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण केली. मुले व मुली यांनी देशभक्तीपर गीते, भाषणे व भारत माता की जय म्हणून परिसर दुमदुमून सोडला होता. वर्षाराणी जाडकर, मिसाळ, अक्षरा लोंढे, प्रेरणा देठे, अमृता तुपे या विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट भाषणे केली.दहावी ब बारावी (आर्ट,सायन्स, कॉमर्स) २०२२-२३ मध्ये नंबर मिळालेल्या विद्यार्थ्यांचा तसेच छचवड विद्यार्थी व शासकीय महाविद्यालयांमध्ये निवड झालेल्या विद्यार्थ्यांचा कार्यक्रमाचे अध्यक्ष ऍड धनंजय बाबर यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. तर प्रशालेस ७०००० रु देणगी दिल्याने ऍड बाबर यांचा विशेष सत्कार गारवाड विकास सोसायटीचे संचालक आनंदा लोंढे व शाळा समिती जितेंद्र देठे यांच्या हस्ते करण्यात आला.

यावेळी मनोगत पर भाषणात संस्थेचे अध्यक्ष डॉ.कुमार लोंढे, प्राचार्य के साठे, विशेष अतिथी बाळासो गायकवाड ( ता.अध्यक्ष भारतीय बौद्ध महासभा) ,शाळा समिती सभापती बाळासो जाडकर, शाळा समिती अध्यक्ष कांबळे इ नी मनोगत व्यक्त केले



कार्यक्रमास संस्थेच्या सचिव डॉ.पंचशीला लोंढे,युवा उद्योजक भैय्या बाबर,जितेंद्र देठे,लक्ष्मण साठे,अशोक मारकड,शिंदे,बापू सुळ,समाधान खरात,अंकुश लोंढे,रणजित सरतापे इ मान्यवर उपस्थित होते.प्रा.अल्ताफ पठाण,प्रा.कारंडे,प्रा.देवकाते,काळे मॅडम,अरुणा लोंढे मॅडम इ स्टाफ ने विशेष परिश्रम घेतले.प्रास्तविक प्राचार्य के साठे यांनी केले तर सूत्रसंचालन प्रा.राजेश वायदंडे यांनी केले शेवट आभार क्लार्क आकाश सरतापे यांनी मानले.

# लोकशाही न्यूजचे चंद्रशेखर भांगे यांचा राज्यपालांच्या हस्ते सन्मान

पुणे/विशेष प्रतिनीधी : किरनळी सुपुत्र आणि लोकशाहीचे पत्रकार चंद्रशेखर भांगे यांनी पत्रकारिता क्षेत्रात केलेल्या उत्कृष्ट कामगिरीमुळे १५ ऑगस्ट च्या निमित्ताने महाराष्ट्राचे माहामहीम राज्यपाल रमेश बैस यांच्या हस्ते काल पुण्यात त्यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रकांत पाटील पुणे शहर श्रमिक पत्रकार संघाचे अध्यक्ष आणि दैनिक पुढारीचे पत्रकार पांडुरंग सांडभोर, दैनिक महाराष्ट्र टाइम्स चे पत्रकार प्रशांत आहेर यांची प्रमुख उपस्थिती होती. किरनळी सारख्या दुर्गम भागातून जाऊन पुण्यासारख्या मेट्रो शहरांमध्ये पत्रकारित सर्वोत्तम नाव कमवून सर्वसामान्यांना आपल्या बातम्यातून न्याय देणारे चंद्रशेखर भांगे यानी शहरात पत्रकारीतेत शिखर गाठल आहे.भांगे यांचा सन्मान झाल्याने सर्वासामन्य नागरीकांनी आनंद व्यक्त केला. चंद्रशेखर भांगे यांनी केलेल्या अनेक बातम्या विधीमंडळात तारांकित झाल्या आहेत .

# स्वातंत्र्य दिनानिमित्त योद्धा प्रतिष्ठानची वैचारिक प्रबोधन रॅली !




अकलूज/प्रतिनिधीः १५ ऑगस्ट म्हणजे सर्व भारतीयांसाठी आनंदाचा दिवस दीडशे वर्ष इंग्रजांचे पाय सर्व भारतीयांच्या छाताडावर नाचले ते पाय याच १५ ऑगस्टला गाडले गेले. आणि भारताचा तिरंगा ध्वज अभिमानाने डौलू लागला. याच भारतीयांच्या सर्वांगीण विकासासाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी अतिशय तळमळीने लोकशाही राज्यघटना लिहिली त्या राज्यघटनेत शोषित,पीडित, वंचितांना, बहुजनांना आणि पशुपक्षी प्राण्यांना सुद्धा संविधानाने न्याय दिला आहे, हेच संविधान बदलून हिंदूराष्ट्र निर्माण करण्यासाठी RSS, BJP सारख्या संघटना युद्ध पातळीवर काम करत आहेत. धर्माच्या नावावर लोकांना भडकावत आहेत, जाती–जातीत भांडणे लावत आहेत. कोणाच्या ना कोणाच्या माध्यमातून महापुरुषांचा अवमान करत आहेत, दंगली घडवून आणत आहेत, हत्याकांड घडवून आणत आहेत.

जाती–धर्माच्या नावावर लोकांना भुरळ पाडत आहेत, तरी अशा सगळ्या घटनांपासून लोकांचे वैचारिक प्रबोधन करण्यासाठी १५ ऑगस्ट रोजी सकाळी ११ वाजता डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करून, आंबेडकर चौक अकलूज ते छत्रपती शिवाजी महाराज स्मारक जय शंकर उद्यान या मार्गाने पायी चालत वैचारिक प्रबोधन रॅली काढण्यात आली. त्यावेळी अनेक देश प्रेमींसह सामाजिक कार्यकर्ते उपस्थित होते १) ये आझादी झूटी है. देश की जनता भुखी हैं ! २) देशाला स्वातंत्र्य मिळाले.पण जनतेचं काय ? ३ )इथली जनता आजही धर्माच्या ठेकेदारांची गुलाम आहे. ४) इंग्रजांमधील आणि आजच्या सरकारमधील फरक काय ? ५) वाढल्या शेतकरी आत्महात्या / शेतकरी टिकेल तर देश टिकेल ६) स्त्रियांवरील वाढते बलात्कार, अत्याचार – बेटी बचाव देश बचाव. ७) बेरोजगारीमुळे होणाच्या युवकांच्या आत्माहत्यांना जबाबदार कोण ? ८) देशाचे भारतरत्न जुगाराची जाहिरात करत आहेत. ९) भारतीयांचे स्थालांतर वाढत आहे , का ? १०) भारत माझा देश आहे.भारत माझा देश राहावा ! ११) रोजगार मिळणाऱ्या कंपन्या पर राज्यात जात आहेत. १२) सरकार अचानक बदलतंय ! १३) राजकारण्यांचा गोंधळ – राज्य देश चुकीच्या माणसांच्या हातात चाललाय १४) त्यांनी किती ही जात–धर्म म्हणू द्या.आपण भारतीय असण्यावर ठाम राहू.

सदर रॅलीत वरील विचारांच्या पाठ्या हातात घेऊन वैचारिक मत मांडले या विचारातून नक्कीच समाज प्रबोधन होईल अशी आशा आहे. असं मत यौद्धा प्रतिष्ठान चे अध्यक्ष शेखर खिलारे यांनी व्यक्त केले.

# वागदरीत पंधरा ऑगस्ट रोजी भारतीय स्वातंत्र्यदिनाच्या अमृतमहोत्सवी वर्षाची विविध उपक्रमाने सांगता

वागदरी/एस.के.गायकवाड : वागदरी ता.तुळजापूर येथे विविध ठिकाणी भारतीय स्वातंत्र्य दिन मोठ्या उत्साहात साजरा करून स्वातंत्र दिनाच्या अम्रत मोहत्सवाची सांगता करण्यात आली. स्वातंत्र्य दिनाच्या निमित्ताने जिल्हा परिषद प्राथमिक शाळा वागदरी येथे मुख्याध्यापिका महादेवी जत्ते यांच्या हस्ते राष्ट्रीय ध्वजा कार्यक्रम अत्यंत उत्साहात पार पडला. या निमित्ताने महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे तालुका उपाध्यक्ष गणेश बालाजी बिराजदार यांच्या वतीने शालेय विद्यार्थ्यांसाठी निबंध,रांगोळी तसेच भाषण अशा विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते.




त्याचे बक्षीस वितरण गावाच्या सरपंच सौ तेजाबाई मिटकर,उपसरपंच मिनाक्षी बिराजदार, सर्व ग्रामपंचायत सदस्य,शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष व उपाध्यक्ष सदस्य,गावातील प्रतिष्ठित नागरिक यांच्या हस्ते करण्यात आले.तसेच गावातील राम शशिकांत बिराजदार यांनी राष्ट्रीय स्तरावरील उडखठ छएढ २०२३(लहशाळलरश्र डलळशपलश) परीक्षा संपूर्ण देशात ९१ व्या क्रमांकाने पास झाल्याबद्दल शाळेच्या वतीने उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.तसेच दिनांक ११ ऑगस्ट २ ०२३ रोजी राज्यस्तरीय बाल चित्रकला स्पर्धा तुळजापूर व नळदुर्ग येथे पार पडली. यात ९ते १२ वर्षे वयोगटतील शालेय विद्यार्थी स्पर्धेत जिल्हा परिषद प्राथमिक शाळा वागदरी येथील इ.७ वी तील विद्यार्थिनी कुमारी दर्शना दत्तात्रय सुरवसे हिने तुळजापूर तालुक्यातुन द्वितीय क्रमांक पटकाविल्या बद्दल कु.दर्शना सुरवसे यांचा ही पालका समवेत सरपंच सौ.तेजाबाई,मिटकर यांच्या हस्ते व मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत सत्कार करण्यात आला. दर्शना सुरवसे हिला शाळेच्या मुख्याध्यापिका महादेवी जत्ते, तसेचसहशिक्षक किसन जावळे, तानाजी लोहार ,मनिषा चौधरी, आरती साखरे मॅडम यांचे विशेष मार्गदर्शन लाभले.

तसेच येथील ग्रा. प.कार्यालयाच्या प्रागंणात स्वातंत्र्य दिनाच्या निमित्ताने ग्रा. प.च्या वतीने सरपंच तेजाबाई मीटकर यांच्या हस्ते राष्ट्रीय ध्वजारोहण कार्यक्रम उत्साहत संपन्न झाला.प्रारंभी सरपंच तेजाबाई मीटकर,उपसरपंच मिनाक्षी बिराजदार सर्व ग्रा.प.सदस्य व मान्यवरांच्या हस्ते राष्ट्रपिता महात्मा गांधी,यांच्या प्रतिमेचे पूजन करून सरपंच तेजाबाई मिटकर यांच्या हस्ते राष्ट्रीय ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी ज्ञानेश्वर पाटील ,शिवाजी मिटकर, नामदेव यादव,नागनाथ सुरवसे, चद्रंकात वाघमारे,किशोर सुरवसे शंकर धुमाळ, आमोल पवार,सूर्यकांत वाघमारे, सुरेशभाई परिहार,रामसिंग परिहार,विद्या बिराजदार,मुक्ताबाई बिराजदार शालेय व्यवस्थापन समितीच्या उपाध्यक्षा विजयाबाई वाघमारे,सह ग्रामस्थ उपस्थित होते.

# समता विद्यालयात ‘७७वा’स्वातंत्र्य दिन साजरा

येवला/प्रतिनिधीः समता प्रतिष्ठान येवला संचलित समता माध्यमिक विद्यालय सुरेगाव–रस्ता येथे भारतीय स्वातंत्र्य दिन व अमृत महोत्सवी वर्षाचा सांगता समारोप आज संपन्न झाला.

समता माध्यमिक विद्यालयात मार्च २०२३ शाळांत परीक्षेत विद्यालयात प्रथम आलेली विद्यार्थिनी गायत्री भागवत हिच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले प्रमुख पाहुणे भारतीय सेनेत नुकतेच दाखल झालेले माजी विद्यार्थी कु.अनिल पवार कु.आदित्य बागुल,पोलीस पाटील शब्बीर भाई शहा व सुरेगाव (रस्ता) ग्रामपंचायतचे सरपंच मोहिनी ताई आहेर उपसरपंच अमोल भाऊ ढमाले व विद्यालयाचे मुख्याध्यापक गणेश जाधव यांच्या उपस्थितीत ध्वजारोहण करण्यात आले. याप्रसंगी महाराष्ट्र छात्र सेना (एम.सी.सी.संचलन) विद्यार्थिनींनी कराटेची प्रात्यक्षिक इयत्ता नववी व दहावीच्या विद्यार्थ्यांनी केले




त्यांना शरद शेजवळ सर यांनी मार्गदर्शन केले. याप्रसंगी विद्यालयाचे मुख्याध्यापक गणेश जाधव यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. पोलीस पाटील शब्बीर भाई शहा,माजी विद्यार्थी विजुभाऊ पठाडे त्याचप्रमाणे श्री. वाल्मीक भाऊ मगर यांनी आपले मनोगत व्यक्त केले.या प्रसंगी उद्योजक पागिरे,गजानन चव्हाण,राजेंद्र ढमाले,बालम पठाण,हरूण शहा,फारुक शहा,पोस्ट मास्टर चव्हाण माजी शिक्षक बापूसाहेब मगर विद्यार्थी व ग्रामस्थ उपस्थित होते.विद्यालयातील शिक्षक हरिचंद्र सोनवणे,शरद शेजवळ,विनोद सोनवणे,हरिभाऊ भागवत,बाबासाहेब गोविंद,ज्ञानेश्वर झाल्टे,लक्ष्मण दाणे युवक ग्रामस्थ,आजी–माजी विद्यार्थी मोठया संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व्ही.डी.सोनवणे सर व आभार हरिभाऊ भागवत सर यांनी मांडले.

# श्रावण मासानिमित्त वटवृक्ष मंदिरात भागवत कथा सप्ताहाचे आयोजन : महेश इंगळे

## अंबडचे श्रीहरी महाराज रसाळ भाविकांना करणार समुपदेशन

अक्कलकोट/प्रतिनिधी : श्रावण मासानिमित्त येथील श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थान समितीच्या वतीने वटवृक्ष मंदिरात श्रावण मासारंभापासून भागवत कथा सप्ताहाचे आयोजन करण्यात आल्याची माहिती मंदिर समितीचे चेअरमन व नगरसेवक महेश इंगळे यांनी दिली. गुरुवार दि. १७ ऑगस्ट ते बुधवार दि २३ ऑगस्ट (निज श्रावण शुद्ध प्रतिपदा ते श्रावण शुद्ध सप्तमी) अखेर आयोजित या भागवत कथा सप्ताहात जालना जिल्ह्यातील अंबडचे ह.भ.प.श्रीहरी महाराज रसाळ हे भाविकांना भागवत कथेतून समुपदेशन करणार आहेत. हा सप्ताह




वटवृक्ष मंदिरातल्या ज्योतिबा मंडपात दुपारी ४ ते ६ या वेळेत संपन्न होणार आहे, तरी भाविकांनी या भागवत कथा सप्ताह श्रवणाचा लाभ घ्यावा असे आवाहन मंदिर विश्वस्त समितीच्या वतीने समितीचे चेअरमन महेश इंगळे यांनी केले आहे. श्रावण मासातील प्रत्येक श्रावण सोमवारी वटवृक्ष मंदिरात नित्यनियमाने होणारी नैवेद्य आरती ११:३० वाजता न होता सायंकाळी ५:३० वाजता होईल. आरतीनंतर देवस्थानकडून प्रसाद वाटप करण्यात येईल. यानंतर रात्रीची शेजारती होणार नाही अशी माहिती पुरोहित व चोळप्पा महाराजांचे वंशज मोहनराव पुजारी यांनी दिली. याचीही भाविकांनी नोंद घ्यावी असे मंदिर समितीच्या वतीने जाहीर करण्यात आले आहे. यावेळी मंदिर समितीचे सचिव आत्माराम घाटगे, विश्वस्त महेश गोगी, श्रीशैल गवंडी, संजय पवार इत्यादी उपस्थित होते.

# कर्मयोगी स्वर्गीय सुधाकरपंत परिचारक यांच्या स्मृतीप्रित्यर्थ सेवा सप्ताहाचे आयोजन

पंढरपूर/प्रतिनिधीः कर्मयोगी स्वर्गीय सुधाकरपंत परिचारक यांच्या तृतीय पुण्यस्मरण निमित्त पंढरपूर शहर आणि तालुक्यातील विविध ठिकाणी सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. पांडुरंग परिवाराच्या वतीने माजी आमदार प्रशांतराव परिचारक यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील सात दिवस कर्मयोगी सेवा सप्ताह साजरा करण्यात येणार असल्याची माहिती पांडुरंग परिवाराचे युवा नेते प्रणव परिचारक यांनी दिली.



पांडुरंग परिवाराच्यावतीने १७ ऑगस्ट ते २५ ऑगस्ट या कार्य काळामध्ये स्वर्गीय सुधाकरपंत परिचारक स्मृती सेवा सप्ताहाचे आयोजन केले आहे. याबाबत आमदार प्रशांतराव परिचारक, उमेश मालक परिचारक यांच्या मार्गदर्शनाखाली युवा नेते प्रणव परिचारक आणि पांडुरंग परिवारातील ज्येष्ठ नेत्यांच्या अध्यक्षतेखाली शहर आणि तालुक्यातील प्रमुख पदाधिकाऱ्यांची नुकतीच बैठक झाली. त्यानुसार स्वर्गीय सुधाकर पंतांचा वसा आणि वारसा सेवेच्या रूपाने सुरू ठेवण्यासाठी विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

या सेवा सप्ताहाच्या निमित्ताने चंद्रभागा नदी स्वच्छता अभियान, विविध वृद्धाश्रम ,बालकाश्रम, कुष्ठरोग वसाहत ,अंधशाळा, विविध शाळांमध्ये सकस भोजन व शैक्षणिक साहित्याचे वाटप , रक्तदान शिबिर आरोग्य शिबीर, नेत्र तपासणी शिबीर व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिर, दिव्यांग नागरिकांसाठी , महिलांसाठी हिमोग्लोबिन व थायरॉईड तपासणी शिबिर, शालेय विद्यार्थ्यांना गणवेश वाटप, शालेय विद्यार्थ्यांसाठी तसेच महाविद्यालयीन विद्यार्थी व दिव्यांगांसाठी विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. दंतरोग तपासणी शिबिर ,महिला बचत गटांना अर्थसहाय्य करणारे कर्जवाटप सोहळा असे कार्यक्रम आयोजित केले आहेत. याशिवाय भजन कीर्तनाच्या माध्यमातून सामाजिक प्रबोधन देखील होणार आहे. याशिवाय पंढरपूर शहरातील गणेश रुग्णसेवा मित्र मंडळाच्या वतीने कायमस्वरूपी कर्मयोगी दिव्यांग सल्ला व मार्गदर्शन केंद्र उभा करण्यात येत आहे. हे सर्व कार्यक्रम २५ ऑगस्ट पर्यंत पंढरपूर शहर आणि तालुक्यात विविध ठिकाणी आयोजित करण्यात आले आहेत. याशिवाय काही विशेष कार्यक्रमाचे आयोजन देखील पांडुरंग परिवाराच्या वतीने होत आहे.

सेवा सप्ताह मधील विविध कार्यक्रमाचे आयोजन हे पंढरपूर शहरातील आजी माजी नगरसेवक, पांडुरंग परिवारातील पदाधिकारी पांडुरंग परिवारातील युवा नेते मित्रमंडळी, आणि कर्मयोगी स्वर्गीय सुधाकरपंत परिचारक यांच्यावर प्रेम करणाऱ्या मंडळींकडून करण्यात आले आहे.

गुरुवारी स्वर्गीय सुधाकरपंत परिचारक यांच्या स्मृतिदिनी पंढरपूर शहरातील विविध भागांमध्ये तसेच ग्रामीण भागातील सर्व गावांमध्ये सकाळी नऊ वाजता प्रतिमा पूजनाचे आयोजन करण्यात आले आहे. तर कर्मयोगी सुधाकरपंत परिचारक पांडुरंग सहकारी साखर कारखान्याच्या वतीने वाखरी येथील नियोजित कर्मयोगी सुधाकरपंतांच्या स्मारकाच्या ठिकाणी कीर्तन व पुष्पांजली कार्यक्रमाचे आयोजन कारखान्याने केले आहे. तरी या सर्व कार्यक्रमास पंढरपूर शहरातील नागरिकांनी पांडुरंग परिवारातील सदस्य हितचिंतक मित्र आप्तेष्ट यांनी बहुसंख्येने उपस्थित राहून मोठ्या मालकांचा विचारांचा वारसा सेवारुपी आत्मसात करावा. असे आवाहन या निमित्ताने आमदार प्रशांतराव परिचारक, व उमेशराव परिचारक यांच्या वतीने युवा नेते प्रणव परिचारक यांनी केले आहे.

# शासनाच्या सर्व योजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी करणार : बी.आर.माळी

पंढरपूर/प्रतिनिधीः मंगळवेढा सांगोला चे नूतन प्रांत अधिकारी बिहार माळी यांचा सत्कार मंगळवेढा तालुका काँग्रेसचे अध्यक्ष प्रशांत साळे सर यांच्या शुभहस्ते करण्यात आला त्यावेळी बोलत होते मंगळावर सांगोला हे दुष्काळी पट्ट्यातील तालुके आहेत म्हणून ओळखले जातात मंगळवेढ्यातील मी २००८ स* तहसीलदार म्हणून काम केलेले असल्याने त्याचा फायदा मला प्रांत अधिकारी म्हणून होईल असा विश्वास यावेळी त्यांनी व्यक्त केला मंगळवेढा तालुका काँग्रेसचे अध्यक्ष प्रशांत साळवे सर यांनी दुष्काळी भागातील लोकांच्या व्यथा मांडल्या व शेतकऱ्यांना प्यायला पाणी नाही शेतीला पाणी नाही जनावरांना पाणी नाही तसेच पावसाळ्यापूर्वी शेअर नंदनी तलाव आसपास बंधाऱ्यातील गाळ उचलण्याची परवानगी मिळावी अशी विनंती त्यांनी प्रांताधिकारी यांच्याकडे केली प्रशांत साळे पुढे म्हणाले पावसाळ्याचे अडीच महिने



होऊनी अद्याप तालुक्यात समाधानकारक पाऊस झाला नाही त्यामुळे शेतकरी हवालदिल झाला आहे मंगळवेढा तालुक्यातील साठ ते सत्तर टक्के शेतकऱ्यांनी खरिपाची पेरणी केली आहे पण पिके पाण्याअभावी शेतकऱ्यांच्या डोळ्यात डोळ्यात देखत कोमेजून जात आहेत तरी त्वरित शासनाने यांची दखल घेऊन तसेच चारा व पाण्याची टंचाई बासत असल्याने मंगळवेढा तालुक्यातील पशुधन वाचवण्यासाठी तालुक्यामध्ये चारा छावणी व चारा डेपो चालू करावेत अशी विनंती त्यांनी प्रांताधिकारी यांच्याकडे केले आहे यावेळी उपस्थित अर्जुनराव तात्या पाटील माजी जिल्हा परिषद सदस्य सोलापूर प्रकाश भोसले तसेच चेअरमन कविता अर्बन बँक सोलापूर मंगळवेढा तालुका विधानसभा अध्यक्ष मारुती बापू वाकडे भगवान माने ग्रामपंचायत सदस्य संतोष शिरसागर बीटी पुजारी लालासाहेब भंडारी आकाश भोसले मदर सय्यद संदीप पवार पसंती प्रमुख मंगळवेढा इत्यादी उपस्थित होते

# श्री विठ्ठल प्रशालेत ध्वजारोहण समारंभ संपन्न

पंढरपूर/प्रतिनिधीः वेणुनगर श्री विठ्ठल प्रशाला व कला विज्ञान कनिष्ठ महाविद्यालयाच्या प्रांगणात स्वातंत्र्यदिनानिमित्त ध्वजारोहण श्री विठ्ठल सह. साखर कारखान्याचे संचालक मा.श्री. धनंजय उत्तम काळे यांच्या शुभहस्ते करण्यात आले. प्रशालेचे प्राचार्य मा. श्री. व्ही.जी.नागटिळक यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक व पाहण्यांचे स्वागत केले.



या प्रसंगी बोलताना श्री विठ्ठल सह. सा. कारखान्याचे संचालक प्रा.तुकाराम मस्के म्हणाले की; १५ ऑगस्ट १९४७ या दिवसी ब्रिटीशांच्या जुलमी राजवटीतून भारतमाता मुक्त झाली तो हा दिवस. स्वातंत्र्य हे सहजासहजी मिळाले नाही त्यासाठी अनेक वीरजवानांनी प्राणाचे बलिदान दिले. आज स्वातंत्र्यदिन साजरा करीत असताना इतिहासात पाठीमागे वळून पाहिले असता आपल्या देशाने सर्वच क्षेत्रात अनेक आघाडीवर दैदिप्यमान प्रगती केलेली आहे. आपल्या देशाचे स्वातंत्र्य आणि प्रगतिचा नावलौकीक टिकविण्यासाठी तुम्ही विद्यार्थीनी स्वच्छतेचा व पर्यावरण सुरक्षीत राखण्याचा संदेश घरोघरी पोहचवण्याचे व भ्रष्टाचार मुक्त बलशाली भारत घडवायचा असेल तर प्रत्येक विद्याध्याने आणि भारतीयांनी आपली जबाबदारी प्रामाणिकपणे पार पाडल्यास या देशाचे स्वातंत्र्य आबादित राहील त्यासाठी दृढनिर्धार आणि एक जूटीचीच गरज आहे. आजचा आदर्श विद्यार्थी हा भावी राष्ट्राचा आदर्श नागरिक व्हावा यासाठी आपण सर्वांनी स्वातंत्र देशाचे नागरिक असल्याचं अभिमान बाळगावा असे म्हणाले. या प्रसंगी गरीब आणि होतकरू विद्यार्थ्यांना पाहुण्यांच्या हस्ते गणवेश वाटप करण्यात आले. तसेच विद्याध्यांनी देशभक्तीपर गीते पारंपारीक नृत्य, लेझीम दांडपटा चालविणे यासारखे कार्यक्रम सादर केले.

यावेळी श्री विठ्ठल सह. सा. कारखान्याचे व्हा.चेअरमन मा.सौ. प्रेमलता रोंगे, कारखान्याचे संचालक, प्रा.तुकाराम मस्के .मा. श्री. प्रविण कोळेकर, मा. श्री. सुरेश भुसे. मा. श्री. जनक भोसले, मा. श्री. संभाजी भोसले. मा. श्री. ताय्यापा गवळी, मा.श्री.सचिन खटके. मा. श्री. नवनाथ नाईकनवरे व कार्यकारी संचालक मा.श्री.डी. आर. गायकवाड यांच्यासह प्राचार्य श्री. व्ही. जी. नागटिळक, पर्यवेक्षक श्री. डोंगरे आर. एन. कारखान्याचे अधिकारी, शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी, कामगार, शेतकरी, पालक व विद्यार्थीी मोठ्या संखेने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचलन प्रा.श्री चव्हाण एसबी यांनी केले तर प्रा श्री सट्टे डी.व्ही.यांच्या आभाराने कार्यक्रमाची सांगता झाली...

# स्वातंत्र्यदिनी तहसिल कार्यालय येथे ध्वजारोहण संपन्न


पंढरपूर/प्रतिनिधीः स्वातंत्र्याच्या ७६ व्या वर्धापन दिनानिमित्त तहसिल कार्यालय येथे प्रांताधिकारी गजानन गुरव यांच्या हस्ते राष्ट्रीय ध्वजारोहणाचा शासकीय कार्यक्रम संपन्न झाला.

यावेळी मोहोळचे प्रांताधिकारी अजिंक्य घोडगे, उपविभागीय पोलीस अधिकारी अर्जुन भोसले, परिविक्षाधीन पोलीस उपअधिक्षक रोहिणी बानकर, तहसिलदार सुशिल बेल्हेकर, अपर तहसिलदार तुषार शिंदे, गटविकास अधिकारी प्रशांत काळे, मुख्याधिकारी अरविंद माळी, नायब तहसिलदार मनोज श्रोत्री, पंडीत कोळी, वैभव बुचके, पुरवठा निरिक्षण अधिकारी एस.एम. कन्हेरे, महिला बालविकास प्रकल्प अधिकारी समाधान नागणे यांच्यासह स्वातंत्र्य सैनिक, मान्यवर नागरिक, पदाधिकारी तसेच अधिकारी-कर्मचारी मोठया संख्येने उपस्थित होते. यावेळी पंढरपूर पोलीस पथकाच्यावतीने मानवंदना देण्यात आली.



# डॉ.शरद गायकवाड यांना पुरस्कार

कोल्हापूर :येथील महावीर महाविद्यालयाच्या मराठी विभागातील प्रा. डॉ. शरद गायकवाड यांना नुकताच सांगली येथील वाटेगाव (ता.वाळवा) येथे राज्यस्तरीय अण्णाभाऊ साठे जन्मभूमी पुरस्कार अण्णाभाऊंच्या सुनबाई सावित्रीबाई साठे व अण्णाभाऊंचे नातू सचिन भाऊ साठे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. या पुरस्कारासाठी समता फौंडेशनचे अध्यक्ष प्रा.डॉ.बापू चंदनशिवे,सचिव डॉ.नितीन रणदिवे, डॉ. किशोर खिलारे,प्रा.दत्ता कांबळे,प्रा.अनिल लोखंडे, डॉ. सूर्यकांत गायकवाड, शेखर रणदिवे, संकेत माने, अमोल पाटोळे, युवा उद्योजक कुलदीप भिंगारदिवे,संतोष लोखंडे व अभिषेक रणदिवे आदीनी त्यांचे अभिनंदन केले आहे.



प्रा डॉ शरद गायकवाड कोल्हापूर

# विरमाता श्रीमती शांताबाई बनसोडे यांच्या हस्ते शहीद किर्ती चक्र नायक यशवंत बनसोडे यांच्या शिला फलकाचे अनावरण



नळदुर्ग/दादासाहेब बनसोडे :माझा देश माझी माती या अभियानांतर्गत नगर परिषद नळदुर्ग यांच्या वतीने आज केंद्रीय प्राथमिक शाळा नळदुर्ग येथील प्रांगणात किर्ती चक्र शहीद नायक यशवंत मारुती बनसोडे यांच्या शीला फलकाचे अनावरण करण्यात आले .

हे अनावरण विरमाता श्रीमती शांताबाई मारुती बनसोडे यांच्या हस्ते व नगर परिषदेचे मुख्याधिकारी लक्ष्मण कुंभार माजी नगरसेवक विनायक अहंकारी केंद्रिय मुख्याध्यापक भास्कर मस्के यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नगर परिषदेचे मुख्याधिकारी लक्ष्मण कुंभार होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून माजी नगरसेवक विनायक अहंकारी, केंद्रिय प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक भास्कर मस्के हे होते. प्रथमता देशाचे रक्षण करून आपल्या घरी सेवानिवृती घेऊन परत आले त्या बहादुर माजी सैनिकांचा सत्कार करण्यात आला .

प्रारंभी शालेय विद्यार्थ्यांच्या नृत्य सादर करत स्वागत गीताने उपस्थित मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. या प्रसंगी मुख्याधिकारी लक्ष्मण कुंभार यांच्या हस्ते किर्तीचक्र नायब शहीद यशवंत बनसोडे यांच्या मातोश्री वीरमाता शांताबाई मारुती बनसोडे शहीद राम सादु गायकवाड यांची वीरपत्नी श्रीमती लक्ष्मीबाई गायकवाड सह सर्व माजी सैनिकांचा सत्कार करण्यात आला. यामध्ये विनयकुमार पंडीत, बाळासाहेब जाधव, बळी दस, शिवानंद खद्दे, दशरथ जाधव, प्रकाश मोर्डे, शिवशंकर हत्ते, विश्वनाथ हत्ते, कृष्णा माने, सुरेश सुरवसे, विठल जाधव,सिद्धराम मुळे इत्यादींचा मुख्याधिकारी लक्ष्मण कुंभार यांच्या हस्ते शाल, पुष्गुच्छ व प्रमाण पत्र देवून सत्कार करून वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी माजी नगरसेवक विनायक अहंकारी यांनी शुभेच्छापर मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचलन परिवर्तन सामाजिक संस्था नळदुर्गचे सचिव मारुती बनसोडे यांनी केले तर आभार प्रदर्शन सुरज गायकवाड यांनी केले.

# बोरगाव येथे स्वातंत्र्य दिन मोठया उत्साहात साजरा



तुळजापूर/प्रतिनीधी :देशाचा अमृत महोत्सवी स्वातंत्र्य दिन बोरगाव ता. तुळजापूर येथे मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला दि.१३,१४, व १५ आगस्ट या तीनही दिवशी तिरंगा ध्वज फडकविण्यात आला माजी सरपंच वंदना मधुकर सुतार यांच्या हस्ते व ग्राम पंचायत सदस्य कविता गौतम कांबळे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

शहीद कॅप्टन अविनाश यशवंत सोमवंशी यांच्या शीला फलकाचे अनावरण स्वा.सैनिक मधुकरराव सोमवंशी व सरपंच अर्चना मोहन माने यांच्या हस्ते करण्यात आले यावेळी माजी सैनिकांचा सत्कार करण्यात आला.तर दि.१५ रोजी सरपंच अर्चना मोहन माने यांच्या हस्ते ग्राम पंचायत कार्यालया समोर ध्वजारोहन करण्यात आले. जिल्हा परिषद केंद्रिय प्राथमिक शाळेत ध्वजारोहण करण्यात आले, हुतात्मा बाबुराव बोरगावकर विद्यालयात ध्वजारोहण करण्यात आले विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटीत ध्वजारोहण करण्यात आले भीमनगर येथे राजरत्न तरुण मंडळ बोरगाव यांच्या कडून गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला . यावेळी गावातील माजी सैनिक, स्वातंत्र्य सैनिक व गावातील सर्व प्रतिष्ठित नागरिक मोठया संख्येने उपस्थित होते.

विद्यार्थ्यांना खाऊ वाटप करण्यात आले सर्व शिक्षक, सरपंच अर्चना मोहन माने,उपसरपंच लक्ष्मण पाटील,ग्राम पंचायत सदस्य बसवंतराव मुळे, कविता कांबळे, राम कलकुटे, , ग्राम सेवक नवगिरे,मोहन माने,मुख्याध्यापक अशोक सुळ सह सर्व शिक्षक, बचत गटांच्या महिला, सीआरपी, आशा कार्यकर्ती , मधुकर सुतार,सह अनेक कार्यकर्ते उपस्थित होते

# सातनदुधनी येथे जय दुर्गादेवी बहुउद्देशीय समाजसेवी संस्थेच्या वतीने वृक्षारोपण व मान्यवरांचा सत्कार

अक्कलकोट/प्रतिनिधी :अक्कलकोट तालुक्यातील सातनदुधनी येथील जय दुर्गादेवी बहुउद्देशीय समाजसेवी संस्थेच्या वतीने ग्रामविकास अधिकारी पदावर बढती मिळाल्या बद्धल सादिक वळसंगकर यांचा सत्कार करण्यात आला आणि या वेळी त्यांच्या शुभ हस्ते दुर्गादेवीची महापूजा करण्यात आली अक्कलकोट तालुक्यातील सातनदुधनी येथे गावचे ग्रामविकास अधिकारी म्हणून सादिक वळसंगकर यांची बढती झाली आहे याबद्दल संस्थेच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला,



तसेच वळसंगकर यांच्या हस्ते दुर्गादेवी मातेची पुजा करण्यात आली,भारताचे माजी पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांच्या स्मृतिदिनानिमित्त त्यांच्या प्रतिमेचे पूजन याप्रसंगी करण्यात आले. सादिक वळसंगकर यांची ग्रामसेवक पदावरून ग्रामविकास अधिकारीपदी पदोन्नती झाल्याबद्दल जय दुर्गादेवी बहुउद्देशीय समाजसेवी संस्थेकडून सत्कार करण्यात आले. ठाणे शहर पोलीस दलाचे महेश कोळी, तसेच कोळीबेट चे माजी सरपंच प्रकाश दुपारगुडे, समाधान आहिरे. यांचा ही सत्कार यावेळी करण्यात आला. यावेळी संस्थेच्या वतीने मान्यवरांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी सरपंच विठ्ठलराव खताळ. कोळी महासंघ युवा आघाडीचे अक्कलकोट तालुका अध्यक्ष आणि संस्थेचे संस्थापक अध्यक्ष देवेंद्र कोळी तसेच ग्राम तंटामुक्त समितीचे अध्यक्ष नामदेव काळे, शिक्षकेतर कर्मचारी तालुका उपाध्यक्ष धर्मराज अरबळे. माणिकराव कुलकर्णी दत्तात्रय काळे उजनप्पा देवकते ग्राप पंचायत कर्मचारी शिवचलप्पा कोळी संगणक परिचालक अमोल काळे तसेच अंबादास सोलंकर, बसवंत खताळ, अनिल शिंदे, आप्पाशा बंडगर ,अनिल सरवादे, सिद्धकली नदाफ, सैपन अत्तार भागण्णा कोळी, सुनील लोणार, सिद्धाराम कुंभार आदि मान्यवर उपस्थित होते, या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राज कोळी यांनी केले तर आभार प्रदर्शन संगप्पा कोळी यांनी मानले.